# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः09.06.2023** **वारःशुक्रवार**

---

1. प्राथमिक कृषी कर्ज सहकारी संस्थांना पंतप्रधान शेतकरी समृद्धी केंद्रांच्या कक्षेत आणण्याचा केंद्राचा निर्णय
2. रिझर्व बँकेचं द्वैमासिक पतधोरण जाहीर; रेपो रेट साडेसहा टक्क्यांवर कायम
3. नाशिकच्या आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा आज रौप्य महोत्सवी वर्धापन दिन
4. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका सज्ज
5. विश्वचषक कसोटी क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पहिल्या डावात भारताची अडखळत सुरुवात आणि
6. नैऋत्य मान्सून केरळमध्ये दाखल; राज्यात सर्वत्र आज पूर्वमोसमी पावसाचा अंदाज

**<u>सहकार निर्णय</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं ‘सहकारातून समृद्धी’ आणण्याचं स्वप्न साकार करण्याच्या दृष्टीनं केंद्र सरकारनं पाच महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शहा यांनी केंद्रीय रसायन आणि खत मंत्री मनसुख मांडवीय यांच्यासमवेत काल नवी दिल्लीत एक बैठक घेतली; त्यावेळी हे निर्णय घेण्यात आले. देशभरात सध्या सुमारे 1 लाख प्राथमिक कृषी कर्ज सहकारी संस्था कार्यरत आहेत. त्यापैकी ज्या संस्था खतांचे किरकोळ विक्रेते म्हणून काम करत नाहीत अशा संस्था मॅपिंगच्या आधारे निश्चित करुन त्यांना व्यवहार्यतेच्या आधारावर टप्प्याटप्प्याने खतांचे किरकोळ विक्रेते म्हणून काम करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

तसंच ज्या प्राथमिक कृषी कर्ज सहकारी संस्था सद्यस्थितीत पंतप्रधान शेतकरी समृद्धी केंद्र म्हणून कार्यरत नाहीत त्यांना त्या कार्यकक्षेत आणण्यात येईल. सेंद्रिय खतांच्या विपणनाशी कृषी कर्ज सहकारी संस्था जोडण्यात येतील. खतं तसंच कीटकनाशकांच्या फवारणीसाठी ड्रोन उद्योजक म्हणूनही प्राथमिक कृषी कर्ज सहकारी संस्थेचा वापर करून घेता येईल, असे विविध निर्णय या बैठकीत घेण्यात आले. या महत्त्वाच्या निर्णयांमुळे प्राथमिक कृषी कर्ज सहकारी संस्थांच्या उत्पन्नात वाढ होऊन; ग्रामीण भागातील रोजगाराच्या संधी देखील वाढण्याची अपेक्षा आहे.

**<u>रिझर्व्हबँक</u>**

भारतीय रिझर्व बँकेनं या आर्थिक वर्षातलं आपलं दुसरं द्वि-मासिक पतधोरण काल जाहीर केलं. या धोरणात बँकेनं प्रमुख व्याजदरात कोणतेही बदल केलेले नाहीत. रेपो रेट साडेसहा टक्क्यांवर कायम ठेवण्यात आला असल्याचं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी सांगितलं. जगातल्या अनेक मध्यवर्ती बँकांनी आपले व्याज दर वाढवलेले असतानाही भारतात मात्र हे दर कायम राखण्यात आल्याचं ते म्हणाले. चालू आर्थिक वर्षात विकास दर साडेसहा टक्के आणि महागाई दर 4 टक्क्यांपेक्षा जास्त राहील असं दास म्हणाले. भारताची अर्थव्यवस्था मजबूत आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार देशात सातत्यानं गुंतवणूक होत असल्याचं दिसून येत आहे, असं दास यांनी सांगितलं. बँकांना रूपे प्रीपेड फॉरेक्स कार्ड जारी करण्याची परवानगी देण्यात आली असल्याची घोषणाही दास यांनी काल केली. दोन हजार रुपयांच्या नोटांबाबत बोलताना ते म्हणाले की नागरिकांनी आतापर्यंत 50 टक्के नोटा बदलून घेतल्या किंवा परत केल्या आहेत.

**<u>अग्नी क्षेपणास्त्र</u>**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था DRDOनं अग्नी प्राईम या बॅलेस्टिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली आहे. ओडिशामध्ये डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम बेटावर बुधवारी रात्री ही चाचणी घेण्यात आली. दोन हजार किलोमीटर अंतरावरील लक्ष्य भेदण्याची या क्षेपणास्त्राची क्षमता असून हे क्षेपणास्त्र आता लवकरच सैन्य दलात समाविष्ट केलं जाणार आहे. या यशाबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी DRDOच्या शास्त्रज्ञांचं तसंच सैन्य दलांचं अभिनंदन केलं आहे.

**<u>आरोग्य विद्यापीठ</u>**

नाशिक इथल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा आज रौप्य महोत्सवी वर्धापन दिन साजरा होत आहे. यानिमित्त आज आणि उद्या विविध कार्यक्रम होणार असून आज संध्याकाळी विद्यापीठात होणाऱ्या सोहोळ्याला माजी सनदी अधिकारी किरण बेदी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहाणार आहेत. रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने कुलगुरू लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर यांनी काल पत्रकारांशी संवाद साधला. विद्यापीठाच्या आगामी काळातील धोरणांमध्ये शैक्षणिक, संशोधन आणि आरोग्य सेवांच्या सुवर्ण त्रिकोणाची संकल्पना मांडली असून, त्यादृष्टीने विद्यापीठाने अभ्यासक्रम तयार केले असल्याची माहिती लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर यांनी यावेळी बोलताना दिली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने आंतरवासीयतेच्या रचनेत बदल केला असून विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक कोणतेही पाच शिक्षणक्रम अनिवार्य असतील असं त्यांनी सांगितलं.

**<u>जागरुक पालक सुदृढ बालक</u>**

राज्याच्या जागरुक पालक, सुदृढ बालक तपासणी कार्यक्रमांतर्गत पुणे महापालिकेने शहरातील खाजगी, सरकारी शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमधील लक्ष्य गटातील 4 लाख 65 हजार विद्यार्थ्यांची तपासणी केली आहे. नऊ फेब्रुवारीपासून हा कार्यक्रम सुरू आहे. या तपासणीत काही मुलांमध्ये अशक्तपणा,

तर काहींमध्ये लठ्ठपणा; तसंच जीवनसत्त्वांची कमतरता दिसून आली. ऐकुया याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून

**जागरुक पालक, सुदृढ बालक कार्यक्रमांतर्गत नवजात शिशूपासून ते 16 वर्षे वयोगटाच्या मुला- मुलींची तपासणी केली. या तपासणीत तीन हजार 340 बालकांना अशक्तपणा, 604 बालकांना लठ्ठपणा, तर 380 बालकांमध्ये अ जीवनसत्वाची कमतरता असल्याचं आढळून आलं. 704 बालकांमध्ये ब जीवनसत्व आणि एक हजार 228 बालकांमध्ये ड जीवनसत्वाची कमतरता असल्याची नोंद करण्यात आली आहे. राज्याच्या आरोग्य विभागानं पहिल्यांदाच अशा प्रकारची मुला- मुलींची तपासणी केली असल्याचं पुणे महापालिका सहायक आरोग्य अधिकारी डॉ. वैशाली जाधव यांनी सांगितलं. या माहितीवरून आता मुलांमधील पोषणाच्या कमतरतेवर लक्ष केंद्रित करता येईल; मुलांची ही शारीरिक विकासाची वर्षे असतात. या वयात शरीरात जे घटक आवश्यक असतात त्यांच्याच कमतरतेमुळे त्या मुलांना पुढे आरोग्याचे अनेक प्रश्न निर्माण होऊ शकतात; त्यामुळे ही कमतरता भरून काढायला या तपासणीची मदत होणार आहे; यातून मिळालेल्या माहितीच्या सहाय्याने आरोग्य विषयक कार्यक्रम तयार करता येतील, असं डॉ जाधव म्हणाल्या. गंभीर आजार असणाऱ्या, शस्त्रक्रियेची गरज असणाऱ्या मुलांवर तत्काळ आरोग्य सेवाकेंद्रात उपचार सुरू केले असल्याचं देखील डॉ. जाधव यांनी सांगितलं. तर साथरोग काळात अनेक भागातील मुलांना पोषक आहार मिळत नव्हता त्यामुळे अशा मुलांमध्ये जीवनसत्त्वांचा अभाव दिसून आला होता. आम्ही त्याविषयी जागृती करत आहोत, असं ससून रुग्णालयाच्या बालरोग विभागप्रमुख डॉ. आरती किणीकर यांनी सांगितलं. आकाशवाणी बातम्यांसाठी भूषण राजगुरू, पुणे.**

**<u>पालखी सोहळा</u>**

संत श्री ज्ञानेश्वर महाराज आणि संत श्री तुकाराम महाराज यांच्या आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी पिंपरी चिंचवड महापालिका सज्ज झाली आहे. यंदाची वारी हरित वारी निर्मल वारी आणि प्लास्टिक मुक्त वारी करण्यासाठी आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासनाच्या विविध विभागांची बैठक काल झाली. पालखी मार्गावर प्रत्येक 200 मीटर अंतरावर दहा अधिकाऱ्यांच्या पथकांची नेमणूक करण्यात आली. सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करणे, आकुर्डी इथल्या मुक्कामी नियंत्रण कक्ष उभारणे, शौचालय, स्नानगृह, पाणीपुरवठा यांची व्यवस्था, अग्निशमन वाहन, पाण्याचे टँकर, रुग्णवाहिका यासह अनेक आवश्यक बाबींचा आढावा शेखर सिंह यांनी यावेळी घेतला

**<u>पालखी</u>**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी सोहोळा प्रस्थानाच्या पार्श्वभूमीवर आळंदीत वारकरी दिंड्यांची वाहने सोडून अन्य अवजड वाहनांच्या वाहतुकीला बंदी घालण्यात आली आहे. त्याचबरोबर आळंदीच्या प्रवेशद्वारावर पोलिसांची तपासणी नाके उभारण्यात आले आहेत. येत्या 12 तारखेपर्यंत हे निर्बंध कायम राहणार आहेत. येत्या रविवारी माउलींच्या पालखी सोहोळ्याचे प्रस्थान होणार असून त्या दिवशी रात्रीचा

मुक्काम समाधी मंदिराशेजारील आजोळ घरीच राहणार आहे. सोमवारी सायंकाळपर्यंत पालखी पुण्यनगरीत दाखल होणार आहे. दरम्यान राज्यातून तसंच राज्याबाहेरुनही मोठ्या संख्येनं वारकरी भाविक अलंकापुरीमध्ये दाखल होऊ लागले असून इंद्रायणीचा काठ विठू माऊलीच्या गजराने दुमदुमून गेला आहे.

**<u>पालखी-सातारा</u>**

पालखी सोहळ्यादरम्यान भाविकांना पालखी मार्ग, पालखी तळ, विसावा आणि रिंगणाच्या ठिकाणी पाणी, आरोग्य आणि स्वच्छतेच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात त्याचबरोबर स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावं, असे निर्देश राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रशासनाला दिले आहेत. विखे पाटील यांनी काल पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील पालखी तळांना भेट देऊन तयारीचा आढावा घेतला.

**<u>अभंग स्पर्धा</u>**

राज्य कारागृह विभाग आणि शरद क्रीडा प्रतिष्ठान तर्फे कारागृहातील कैद्यांसाठी अभंग स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. या स्पर्धेची अंतिम फेरी येत्या 13 जून रोजी येरवडा कारागृहात होणार आहे. कारागृह विभागाचे अपर महासंचालक अमिताभ गुप्ता यांनी काल ही माहिती दिली. प्रबोधनातून मत परिवर्तन करण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये 29 संघ सहभागी झाले होते. त्यापैकी कोल्हापूर, तळोजा, नाशिक, अमरावती पुणे नागपूर या संघांची अंतिम फेरीत निवड झाली आहे. तर बीड, वर्धा, अलिबाग, ठाणे, नगर या संघाना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात येणार आहे. या उपक्रमात सहभागी झालेल्या 350 कैद्यांना प्रशस्ती पत्रक देण्यात येणार आहे.

**<u>कवयित्री-गडचिरोली</u>**

जम्मू आणि काश्मीरमध्ये आयोजित अखिल भारतीय आदिवासी लेखक चर्चासत्रासाठी गडचिरोली इथल्या आदिवासी कवयित्री आणि लेखिका कुसुम अलाम यांना निमंत्रित करण्यात आलं आहे. उद्या आणि परवा असे दोन दिवस हे चर्चासत्र होणार आहे. आदिवासी भाषा, संस्कृती आणि साहित्य यावर चर्चासत्रात चर्चा करण्यात येणार आहे.

**<u>नॅक</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या ज्या महाविद्यालयांनी अद्याप नॅक मूल्यांकन करून घेतले नसेल अशा महाविद्यालयांना येत्या 2023-24 या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्षाचे प्रवेश करता येणार नाहीत अशा सूचना विद्यापीठाने प्रशासनाने एका परिपत्रकाद्वारे संबंधित महाविद्यालयांना दिल्या आहेत. विद्यापीठाच्या पूर्वपरवानगी शिवाय महाविद्यालयांनी प्रवेश करू नयेत, अन्यथा संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थेची राहील, असेही या परिपत्रकात नमूद करण्यात आलं आहे.

**बालविवाह-उस्मानाबाद**

बालविवाह रोखण्यासाठी बाल संरक्षण विभाग तसेच शिक्षण विभागाने सजग आणि सर्तक राहण्याचे निर्देश उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले आहेत. बालविवाह निर्मुलन जिल्हा कृती दलाच्या विशेष आढवा बैठकी ते काल बोलत होते. पंतप्रधान  मातृवंदन योजनेसाठी अल्पवयीन लाभार्थीची नोंद झाल्यास गुन्हा नोंद करण्याच्या सूचनादेखील गुप्ता यांनी दिल्या आहेत.

**शेतकरी-अहमदनगर**

शेतकऱ्याला परवडतील आणि शेतीतील विविध कामे करणे अधिक सुसह्य होण्यासाठी शेतीमधील यांत्रिकीकरणात क्रांती होणे गरजेचं असल्याचं प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉक्टर पी.जी. पाटील यांनी केलं आहे. मजुर टंचाईमुळे शेती आव्हानात्मक बनत चालल्यानं शेतकरी शहरांकडे स्थलांतरीत होत असल्याच्या परिस्थितीवर राहुरी इथं सातव्या पंचवार्षिक पुनरावलोकन समितीच्या 3 दिवसांच्या बैठकी दरम्यान ते काल बोलत होते. महाराष्ट्रासह राजस्थान आणि गुजरात राज्यातील 14 प्रकल्पांचे प्रमुख संशोधक आणि शास्त्रज्ञ यावेळी  उपस्थित होते.

**गोसेखुर्द-भंडारा**

पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे भंडारा जिल्ह्यातील गोसेखुर्द धरणातून विसर्ग सोडतांना किमान 4 तास अगोदर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाला माहिती देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले आहेत. त्यांनी काल पवनी तालुक्यातील गोसेखुर्द प्रकल्प कार्यालयाला त्यांनी भेट दिली. भंडारा ते गोसेखुर्द धरण दरम्यान पाण्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण करणाऱ्या संभाव्य बाबी आणि ठिकाणांची पाहणी करण्याची सूचना कुंभेजकर यांनी यावेळी दिली.

**पाणी-धुळे**

धुळे तालुक्यातील 15 गावे, शिंदखेडा तालुकयातील 5 गावे तर जळगाव जिल्ह्यातील अमळनेर तालुकयातील 16 गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत आहे. त्यामुळे अक्कलपाडा धरणातून 200 दशलक्ष घनफूट पाणी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या आदेशानुसार काल पांझरा नदी पात्रात सोडण्यात आलं आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

**कृषी कारवाई-जालना**

जालना जिल्हा कृषी विभागानं दोन कृषीसेवा केंद्राचे परवाने रद्द केले असून, 37 कृषीसेवा केंद्र चालकांना तात्पुरती विक्री बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. कपाशी बियाणाच्या विशिष्ट वाणांची चढ्या दरानं होत असलेली विक्री आणि खरेदी-विक्रीच्या नोंदीत तफावत आढळल्यानं ही कारवाई करण्यात आल्याची माहिती जिल्हा कृषी अधिकारी गुणवंत कापसे यांनी दिली आहे. शेतकऱ्यांनी कपाशी बियाणांच्या विशिष्ट वाणाचा आग्रह धरू नये, असं आवाहन कृषी जिल्हा कृषी विभागाच्यावतीनं करण्यात आलं आहे.

**<u>अपघात-नाशिक</u>**

नाशिकजवळ कसारा घाटात काल झालेल्या एका अपघातात दोन जैन साध्वींचा मृत्यू झाला. नाशिक शहरातील सिडको इथल्या जैन स्थानकात येत्या दोन जुलैपासून सुरू होणाऱ्या चातुर्मास प्रवचनासाठी मुंबईहून त्या पायी येत होत्या. त्यावेळी एका कंटेनरनं धडक दिल्यानं त्यांचा मृत्यू झाला.

**<u>क्रिकेट</u>**

इंग्लंडमध्ये ओव्हल मैदानावर सुरु असलेल्या, विश्वचषक कसोटी क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात, काल दुसऱ्या दिवसं अखेर भारताच्या पहिल्या डावात 5 बाद 151 धावा झाल्या. के. एस. भारत 5 आणि अजिंक्य राहणे 29 धावांवर खेळत आहेत. ऑस्ट्रेलिया संघाने पहिल्या डावात 469 धावा केल्या असून, भारत अद्याप 318 धावांनी पिछाडीवर आहे. भारताच्या पहिल्या डावाची सुरुवात डळमळीत झाली. रोहित शर्मा, शुभमन गिल, चेतेश्वर पुजारा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा या भारतीय संघाच्या बिनीच्या फलंदाजांना फारशी चांगली कामगिरी करता आली नाही.

**<u>हवामान</u>**

नैऋत्य मान्सून काल केरळमध्ये दाखल झाला. दरवर्षी साधारणपणे 1 जूनला केरळमध्ये दाखल होणाऱ्या मान्सूननं यंदा 7 दिवस उशिराने केरळमध्ये प्रवेश केला आहे. पुढच्या 48 तासात केरळचा उर्वरित भाग, तामिळनाडू आणि कर्नाटकच्या काही भागात मान्सूनची आगेकूच होण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

दरम्यान अरबी समुद्रावर तयार झालेल्या बिपरजॉय या चक्रीवादळाचं रुपांतर अतितीव्र चक्रीवादळात होईल आणि पुढच्या तीन दिवसात हे चक्रीवादळ वायव्येकडे सरकेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. राज्यात येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**